| MHKO070008772014 | **<u>रे.क.नं.१३४/२०१४</u>**<br><br>शशिकांत दिगंबर रावळ आणि इतर<br>विरुध्द<br>संभाजी लिंबाजी पाटील |
|---|---|

**<u>निशाणी क्र.१०६ खालील आदेश</u>**

अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले.

२. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जात नमुद केले आहे की, प्रस्तुत कामी यातील प्रतिवादीचा पुरावा सुरु असुन यातील प्रतिवादी यांनी नि.४६/१ वर दि.८/५/७० रोजीचा मुळ खरेदी दस्त हजर केला आहे व सदरचा खरेदी दस्त ३० वर्षापुर्वीचा असल्याने त्यास निशाण देवुन तो पुराव्यात वाचण्यात यावा अशी मागणी केली होती. मे. कोर्टानी प्रतिवादीचा अर्ज मंजूर करुन निशाणी देता येईल पण त्यातील मजकुरासंबधी प्रतिवादीनी योग्य ती कारवाई करावी असा आदेश पारित केला होता. प्रतिवादीचे नि.४६/१ वरील दि.८/५/७० चे खरेदीपत्र यशवंतराव दत्ताजीराव जगदाळे, बॉण्डराइटर, शिरोळ यांनी लिहीले आहे. सध्या ते मयत असुन त्यांचा नातू सचिन शिवाजीराव जगदाळे हे सध्या दस्त लेखनिकाचे काम करतात. नि.४६/१ वरील कागद यशवंतराव दत्ताजीराव जगदाळे यांनी लिहीलेला असल्याची साक्ष या कामी घेणे आवश्यक आहे. तेव्हा अर्जात नमुद साक्षीदारास साक्ष काढणेविषयी त्यांनी विनंती केली आहे.

३. विरुध्द बाजुने सदर अर्जाच्या पाठीमागे आपले म्हणणे देवुन कथन केले आहे की, प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज मान्य व कबुल नाही. प्रतिवादी यांनी सदर प्रकारचा पुरावा पुर्वी का केला नाही याचा खुलासा नाही. केवळ काम लांबवत ठेवणे करीता प्रतिवादीनी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. खरेदीपत्राचा दस्त जुना असुन सदर साक्षीदारास साक्षी समन्स काढणे योग्य होणार नाही. सबब अर्ज नामंजुर करणेची मागणी केली आहे.

४. वादीने प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीचा पुरावा सुरु आहे. प्रतिवादीने सदरचा पुरावा पुर्वी का केला नाही त्याबाबत अर्जात नमुद केलेले आहे. प्रतिवादीस आपला बचाव/म्हणणे सिध्द करण्याची संधी दिली पाहिजे. सदरचा साक्षीसमन्सचा अर्ज मंजुर केला म्हणजे सदर दस्त सिध्द झाला असे नाही. सदर साक्षीदाराचा उलटतपास देखील वादीस घेता येणार आहे. तसे आदेश पारित केल्यास विरुध्द बाजुचे कोणतेही नुकसान होणार नसुन प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर निकाली निघण्यास त्याची मदतच होणार आहे. त्यामुळे अर्जातील कथन व कारण पाहता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादीचा अर्ज (नि.क्र.१०६) हा मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादीने साक्षीभत्ता भरल्यानंतर साक्षीसमन्स काढण्यात यावे.

३. प्रतिवादीने साक्षीभत्ता पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी भरावा.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.07 17:47:07 +0530

दि.०७/०५/२०२६ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर.

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 07/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 07/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 07/05/2026. |